दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.२७ मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २०८ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Thrusday 26 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 208 • Pages 4 • Rate 4 Rs

### पेट्रोल-डिझेलचा मुबलक साठा

**मुंबई**-सोशल मीडियावर पेट्रोल-डिझेल तुटवड्यासंदर्भात जे अफवा पसरवीत आहेत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार, असा इशारा मंत्री गिरीश महाजन यांनी दिला आहे. इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यात गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर गॅस एजन्सीच्या बाहेर लोकांनी रांगा लावल्याचे पाहायला मिळाले होते. आता पेट्रोल-डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांनी पेट्रोल पंपावर गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. मात्र तुटवडा नसल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात येत आहे.गिरीश महाजन म्हणाले, इंधन पुरवठ्यासंदर्भात जगभरात अशीच परिस्थिती आहे, पण आपण संयम बाळगावा. करमर्शियल गॅस बाबतीत शॉर्टेज आहे, घरगुती बाबतीत नाही. भारतात रॉकेल आले असून त्याचा वापर करून आपली गरज भागवू शकतो. तसेच सोशल मीडियावर पेट्रोल-डिझेल तुटवड्यासंदर्भात जे अफवा पसरवत आहेत, त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार असल्याचा इशाराही महाजन यांनी दिला आहे.

# अजितदादांचा घातपात असेल तर आकाश पातळ एक करू

## कोणाच्या बापालाही सोडणार नाही-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा निर्धार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा महत्त्वाचा मुद्दा मांडला. यावेळी त्यांनी सविस्तर माहिती देत तसह तपासाचे तपशीलही मांडले. आमदार रोहित पवार यांच्या भूमिकेवर देखील फडणवीस यांनी सविस्तर उत्तर देत आपण अपघाताच्या चौकशीच्या विरोधात नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच यात कोणाच्या बापालाही सोडणार नसल्याचे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी रोहित पवारांना दिले आहे.


देवेंद्र फडणवीस म्हणाले, एक अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील मुद्दा सन्माननीय रोहित पवार आणि इतरही अनेकांनी हा मांडला आहे. मी सुरुवातीला याची वस्तुस्थिती मांडतो. दिनांक २८.१.२०२६ रोजी बारामती विमानतळ येथे धावपट्टी लगत तडठ कंपनीच्या विमानाचा अपघात झाला आणि या दुर्घटनेत अजितदादा पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला. यासंदर्भात केंद्र सरकारने जी काही एसओपी आहे त्यांची कारवाई सुरू केली. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे देखील आपण चौकशी दिली आहे. सीआयडी याचा तपास एसपी दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्यात आला आहे.आता त्यातली जी काही निरक्षण आहेत, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासासाठी भाडे तत्त्वावर हवाई वाहनांना पुरवठा करण्यासाठी शासनाने दोन एजन्सी नियुक्त केल्या आहेत. दिनांक २७.१.२०२६ रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा मुंबई ते बारामती प्रवास निश्चित झाला. या दौऱ्याची माहिती त्यांचे खासगी सचिवांकडून एरो एयरक्राफ्ट सेल्स या कंपनीच्या प्रतिनिधींना देण्यात आले. त्यानंतर २८ तारखेला मुंबई ते बारामतीच्या दौऱ्यासाठी कंपनीकडून २० वाजून ४५ मिनिटांनी विमान बूक करण्याबाबत कारवाई करण्यात आली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पायलट सुमित कपूर यांची ब्रेथ ॲनलायझर टेस्ट २८ तारखेला सकाळी ७ वाजून ९ मिनिटांनी व कोपायलट शांभवी पाठक यांची टेस्ट सकाळी ७ वाजून १३ मिनिटांनी विमानाच्या उड्डाणापूर्वी करण्यात आली. या टेस्टमध्ये अल्कोहोलचा अंश नाही. अजित पवार हे देवगिरी निवसस्थानवरून विमानतळावर सकाळी ७ वाजून ५२ मिनिटांनी पोहोचले. अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विमानात बसले आणि विमान सकाळी ८ वाजून १२ मिनिटांनी मुंबई विमानतळावरून उड्डाण झाले. मुंबई विमानतळ परिसर तसेच बारामती विमानतळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करण्यात आले आहेत. मुंबईच्या विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये अजित पवार आल्याचे तसेच विमानात बसल्याचे दिसते. परंतु, बारामती विमानतळावर सदर विमान लँड होण्यापूर्वीच दुर्घटनाग्रस्त झाले.

### कोणाच्याही बापाला सोडणार नाही

तसेच पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, एफआयआर दाखल झालाच पाहिजे, असे तुम्हाला वाटत असेल तर भारतीय न्याय संहितेतील तरतुदीनुसार तुम्हाला न्यायालयात दाद मागता येते. त्यानंतर न्यायालय एफआयआर दाखल करा असे निर्देश देते. राजकीय दृष्टीकोन ठेवून कर्नाटक राज्याने हे कृत्य केले आहे. महाराष्ट्राची मानहानी व्हावी म्हणून कर्नाटकने हे केले आहे, असा आरोप यावेळी फडणवीस यांनी केला. आम्ही आकाश पातळ एक करू. अजितदादांचा घातपात असेल तर या प्रकरणात कोणाच्याही बापाला सोडणार नाही, असे आश्वासनही देवेंद्र फडणवीस यांनी दिले.





# पत्नीच्या खून प्रकरणी पतीला आजन्म जन्मठेप कुऱ्हाडीने वार करून केली होती हत्या

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




केजतालुक्यात घडलेल्या एका थरारक खून प्रकरणात न्यायालयाने आरोपी पतीला आजन्म जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.पत्नीच्या गळ्यावर आणि छातीवर कुऱ्हाडीने वार करून तिचा खून करण्यात आला होता.विशेष म्हणजे,गुन्हा केल्यानंतर आरोपी स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर झाला होता.या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील ढाकेफळ येथील चौसा वस्तीवर दि.७ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास भगवान शाहूराव थोरात वय ३३ वर्षे याने त्याची पत्नी आरती भगवान थोरात वय २२ वर्षे हिचा निघृण खून केला. चारित्र्याचा संशय तसेच प्लॉट खरेदीसाठी माहेर हून पैसे आणण्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला होता.घरात कोणी नसताना आरोपीने घराबाहेरच पत्नीवर कुऱ्हाडीने वार करत तिची हत्या केली.


घटनेनंतर आरोपीने वापरलेली कुऱ्हाड मृतदेहाजवळच टाकून तो थेट युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गेला आणि गुन्ह्याची कबुली दिली.माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.या प्रकरणी मयत महिलेचा भाऊ अजय पवार यांच्या फिर्यादी वरून आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.तपास पूर्ण झाल्यानंतर प्रकरण न्यायालयात चालले. सरकारी पक्षाच्या वतीने साक्षीदारांचे जबाब, परिस्थितीजन्य पुरावे आणि वैद्यकीय अहवाल यांच्या आधारे आरोप सिद्ध करण्यात आले. एकूण नऊ साक्षीदारांच्या साक्षीवर न्यायालयाने विश्वास ठेवला.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांनी आरोपी भगवान थोरात याला आजन्म जन्मठेपेची शिक्षा सुनावली.तसेच दहा हजार रुपयांचा दंड आणि दंड न भरल्यास अतिरिक्त सहामहिन्यांची शिक्षा ठोठावली.या खटल्यात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसतानाही परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे गुन्हा सिद्ध करण्यात आला. बचाव पक्षाने अज्ञात व्यक्तीने खून केल्याचा दावा केला होता,मात्र तो न्यायालयाने फेटाळला. मृत्यूपूर्वी महिला पतीच्या ताब्यात असल्याच्या मुद्द्यावरही न्यायालयाने भर देत हा निर्णय दिला.

या प्रकरणी सहाय्यक सरकारी वकील अड. राम बिरंगळ आणि त्यांना मदत करणारे सहाय्यक अड.रविकुमार उदार यांनी युक्तिवाद केला तर महिला पोलिस भालेराव यांनी परिश्रम घेतले.या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

# जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा ;अफवांवर विश्वास ठेवू नका जिल्हा प्रशासनाचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात इंधनाचा साठा पर्याप्त स्वरूपात आहे. नागरिकांनी अनावश्यक साठवणूक टाळावी आणि कोणत्याही अफवांना बळी पडू नये. जिल्हा प्रशासन आणि ऑईल कंपन्या इंधनाचा साठा कायम राखण्या साठी कटिबद्ध आहेत. -शिवकुमार स्वामी, जिल्हा पुरवठा अधिकारी,बीड**



खाडी देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा निर्माण होणार असल्याची अफवा सध्या पसरत आहे.मात्र,बीड जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू आहे.त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये,असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.मागील काही दिवसांपासून आखाती देशांतील तणावाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात इंधन टंचाई भासणार असल्याच्या अफवा पसरल्या होत्या.यामुळे बीड शहर आणि बीड जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांनी मोठ्या प्रमाणात रांगा लावल्याचे चित्र पाहायला मिळाले.या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने स्पष्टीकरण दिले आहे.नेमकी परिस्थिती काय आहे? जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार पुरवठा सुरळीतपणे चालू आहे.जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा असून ऑईल कंपन्यांकडून पुरवठा नियमित सुरू आहे. तांत्रिक विलंबामुळे काही पेट्रोल पंप चालकांनी कंपन्यांची देयके (झरूाशर्पी) उशिराने भरल्यामुळे त्यांच्याकडे साठा पोहोचण्यास थोडा वेळ लागला होता.ही वैयक्तिक पंपांची समस्या असून बीड जिल्ह्यासाठी इंधनाची कोणतीही कमतरता नाही.

**प्रशासनाकडून सूचना**

सर्व तेल कंपन्यांच्या विक्री अधिकारी आणि प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत प्रशासनाने आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

**अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई होणार असून**

काही समाजकंटक जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून नागरिकांमध्ये भीती निर्माण करत आहेत. चुकीच्या अफवा किंवा खोटी माहिती पसरवणाऱ्या व्यक्तींवर कठोर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

# सतोना शिवारात खळबळ: वालंबा येथील व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू; घातपाताची शक्यता?

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



तळोदा तालुक्यातील सतोना शिवारात एका ५० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. कांतिलाल मोतीराम वळवी (राहणार वालंबा, गुजरात) असे मृताचे नाव असून, हा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत गूढ निर्माण झाले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सतोना शिवारातील विनोद मंगा वळवी यांच्या शेतात कांतिलाल वळवी हे मृत अवस्थेत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच परिसरात बघ्यांची गर्दी झाली होती. मृत व्यक्ती ही मूळची गुजरात राज्यातील वालंबा येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

घटनास्थळाची पाहणी केली असता, मृतदेहाच्या मानेवर आणि चेहऱ्याजवळ किरकोळ खरचटल्याच्या खुणा दिसून आल्या आहेत. मृतदेहाची स्थिती आणि या जखमा पाहता हा प्रकार घातपाताचा असावा की अन्य काही, याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत.

घटनेची माहिती मिळताच तळोदा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी तळोदा उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. हा प्रकार खून, आत्महत्या की आकस्मिक मृत्यू आहे, याचा उलगडा वैद्यकीय अहवाल आणि पोलीस तपासानंतरच होणार आहे. सध्या तळोदा पोलीस ठाण्यात याप्रकरणी कायदेशीर कारवाई व पुढील तपास सुरू आहे.

# आष्टीला नगरपंचायतीचा दर्जा द्या! वाढत्या नागरी ताणामुळे मागणी तीव्र; ६ एप्रिलला रास्ता रोको आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील आष्टी गावात झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर करण्याची मागणी आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. याच पार्श्वभूमीवर बुधवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात ग्रामस्थांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत पुढील आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली असून प्रशासनाला जाग आणण्यासाठी ६ एप्रिल रोजी रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा ठाम निर्णय घेण्यात आला.



आष्टी हे जालना जिल्ह्यातील प्रमुख व वेगाने विकसित होणारे गाव मानले जाते. शेगाव-पंढरपूर आणि पाथरी-शनी शिंगणापूर हे दोन महत्त्वाचे राज्य मार्ग गावातून जात असल्याने येथे व्यापार, वाहतूक आणि लोकसंख्येची वाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार १४,०२० असलेली लोकसंख्या अवघ्या १५ वर्षांत जवळपास २५ हजारांच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. या प्रचंड वाढीमुळे पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, रस्ते, प्रकाश व्यवस्था यांसारख्या मूलभूत नागरी सुविधा अपुऱ्या पडत असून ग्रामपंचायतीची यंत्रणा या समस्यांवर प्रभावीपणे मात करण्यात अपयशी ठरत असल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे आष्टीला नगरपंचायतीचा दर्जा देणे ही काळाची गरज असल्याचे मत सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे, १९८२ मध्ये जालना जिल्ह्याची स्थापना झाल्यानंतर आष्टीपेक्षा लहान असलेल्या अनेक गावांना नगरपंचायतीचा दर्जा देण्यात आला. मात्र, लोकसंख्या व विकासाच्या निकषांवर पात्र ठरत असतानाही आष्टीकडे प्रशासनाने सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. गेल्या दोन वर्षांपासून विविध माध्यमांतून मागणी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**प्रस्ताव आधीच मंजूर; तरीही विलंब का?**

सन २०२१-२२ च्या ग्रामसभेत आष्टी ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर करण्याचा ठराव एकमताने मंजूर करून तो पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी डी. बी. काळे यांनी दिली. मात्र, त्यानंतरही प्रस्तावावर कोणतीही गती न मिळाल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात आता ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला असून ६ एप्रिल रोजी होणाऱ्या रास्ता रोको आंदोलनामुळे या प्रश्नाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. आष्टीच्या भविष्यासाठी हा लढा निर्णायक ठरणार असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.

# संपादकीय

## वाढता उष्मा आणि किडनीचे आरोग्य

केईएम रुग्णालयात किडनी प्रत्यारोपणासाठी देशभरातून रुग्ण येतात. प्रत्यारोपणानंतरही दर दोन–तीन महिन्यांनी ते नियमित तपासणीसाठी येत असतात. दोन वर्षांपूर्वी किडनी प्रत्यारोपण झालेल्या व जळगावला राहणाऱ्या विकासचा फोन आला, की अचानक त्याला भयंकर थकवा आला आहे, रक्तदाब कमी झालाय, शिवाय लघवीचं प्रमाणही कमी झालंय. तिथल्या फिजिशियनकडे प्राथमिक उपचार घेऊन तो तातडीने मुंबईला आला आणि केईएममध्ये किडनी ट्रान्सप्लांट आयसीयूमध्ये दाखल झाला. त्याच्या प्रत्यारोपण केलेल्या किडनीचं कामही कमी झालेलं आढळलं. ट्रान्सप्लांट होऊन दहाहून अधिक वर्षं झाली होती, सर्व सुरळीत चाललेलं असताना अचानक गुंतागुंत का निर्माण झाली, हे आम्ही शोधू पाहत होतो. शरीरातील पाणी अचानक कमी झाल्याची म्हणजेच डिहायड्रेशनची अनेक लक्षणं आढळली. कसलाही रक्तस्त्राव नाही, जंतुसंसर्ग नाही, जुलाब–उलट्या नाहीत. मग इतकं गंभीर डिहायड्रेशन होऊन किडनीला इजा व्हायचं कारण काय? जळगावजवळ एका गावात रस्त्याच्या कडेला विकासचं किराणा मालाचं दुकान होतं. हे दुकान पक्क्या बांधकामाचं नव्हतं. त्याच्या भिंती आणि छत ल्युमिनिअमच्या पत्र्याचं होत. गेले काही दिवस जळगाव आणि परिसरात उष्णतेची लाट आली होती. विकासला नेहमीचं कामं करताना प्रचंड थकवा जाणवत होता, आणि दोन तीन दिवसांनी दवाखान्यात दाखल व्हावं लागलं होत. वातावरणातील उष्णतेचा परिणाम होऊन किडनीचं काम करणं अचानक कमी झालं होतं. विकासच्या केसनंतर आमच्या पुढील एका वर्षात किडनी ट्रान्सप्लांट झालेल्या व विविध भागांतून येणाऱ्या नऊ रुग्णांना अशा प्रकारे वातावरणातील उष्णतेमुळे किडनीला इजा झाल्याचं निदर्शनास आलं.‘उन्हाळ्यात सुट्ट्यांसाठी गावी गेले’, ‘उन्हात प्रवास केला’, ‘शेतात काम केलं’ ही व यांसारखी ‘हीट एक्सपोजर’ आम्हाला आढळली. किडनी ट्रान्सप्लांट झालेल्या रुग्णांमध्ये दिसणाऱ्या उष्म्याशी संबंधित आजाराचं संशोधन गेल्या वर्षी आमच्या पथकानं प्रकाशित केलं.वरील सर्व उदाहरणांमध्ये वातावरणातील उष्म्यामुळे किडनीला इजा झाली होती, त्याला ‘हीट रिलेटेड इलनेस’ किंवा ‘उष्म्याशी निगडित आजार’ असं म्हणतात. उष्म्याशी संबंधित आजाराची तीव्रता ‘सौम्य थकवा’ ते गंभीर ‘हिट स्ट्रोक’ अशी काहीही असू शकते. लहान मुलं, वृद्ध, तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनीविकार असलेल्या व्यक्तींमध्ये हा आजार व्हायची शक्यता व तीव्रताही अधिक. अशा सर्वांनी त्यामुळेच उन्हाळ्यात काळजी घ्यायला हवी. ‘हीट वेव्ह’च्या काळात शक्यतो घराबाहेर न पडणं, छत्री, टोपी, हात पाय झाकले जातील असे सुती कपडे परिधान करणं, घराबाहेर पडल्यास पुरेसं स्वच्छ पाणी सोबत बाळगणं, द्रवपदार्थांचं मुबलक सेवन, रक्तदाब, वजन ह्यावर लक्ष ठेवणं व कसलीही शारीरिक लक्षणे आढळली तर त्याकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय सल्ला घेणं महत्त्वाचं.मध्य अमेरिकेतील अनेक देशांत तर उष्म्यामुळे होणारा किडनी विकार–मेजोअमेरिकन नेफ्रोपॅथी– हा मोठा व गंभीर प्रश्न बनला आहे. तिथे उसाच्या शेतांमध्ये काम करणाऱ्या मजुरांमध्ये उष्मा आणि त्याचा परिणाम म्हणून कामादरम्यान वारंवार होणारं डिहायड्रेशन हे किडनीच्या आजाराचं मुख्य कारण ठरत आहे. अशाच प्रकारचा आजार उत्तर महाराष्ट्रातील गावांमधील शेतकरी व शेतमजुरांतही आढळतो. अशा ठिकाणी कामाच्या मर्यादित वेळा, पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा, कामादरम्यान सक्तीची विश्रांती अशा उपाययोजनांची तातडीनं गरज आहे.काही वर्षांपूर्वी चीनमध्ये झालेल्या एका महत्त्वाच्या संशोधनात २.५ पीएम या हवेतील कणांचा संबंध किडनी फिल्टर्सला होणाऱ्या एका महत्त्वाच्या आजाराशी जोडण्यात आला. ग्लोबल वॉर्मिंग, वातावरणातील बदल हे आपल्या दारात, घरात पोहोचले आहेत. त्यामुळे आरोग्याला मोठा धोका निर्माण होतोय, हेच वरील सर्व उदाहरणांतून स्पष्ट होतं. इतर नैसर्गिक आपत्तींप्रमाणेच तापमानवाढीचे परिणाम सर्वाधिक गरिबांना भोगावे लागतात. एअर कंडिशन्ड कार्स, ऑफिस, घरे असलेल्या श्रीमंतांना याची झळ तितकी बसत नसली तरी आज ना उद्या ह्याचे परिणाम सर्वांनाच जाणवणार.किडनीसाठी आणखी एक मानवनिर्मित व सहज टाळता येण्यासारखा धोका आहे. गेल्या काही महिन्यांतील खालील काही बातम्या पहा : मध्य प्रदेशात मैलामिश्रित पाणी प्यायल्याने शेकडोजणांना गंभीर आजारामुळे दवाखान्यात भरती व्हावे लागले, तीसहून अधिक जण दगावले (डिसेंबर, २०२५). मध्य प्रदेश आणि राजस्थानात कफ सिरप प्यायल्याने २५ लहान मुले मृत्युमुखी पडली, यातील अनेकांच्या किडनी फेल झाल्या होत्या. (ऑक्टोबर २०२५). भेसळयुक्त दूध प्यायल्याने आंध्र प्रदेशात १३हून अधिक लोक किडनी निकामी होऊन दगावले. (मार्च २०२६). शरीरात प्रवेश करणाऱ्या सर्व घटकांचा निचरा करण्याचं काम किडनी करीत असल्याने आपल्या वातावरणातील बदलांप्रति ती संवेदनशील आहे. मग उष्मा असो, फेअरनेस क्रीममधील पारा असो, कफ सिरपमधील भेसळ असो, की भेसळयुक्त दूध असो.उष्म्याने झालेल्या आजारातून बऱ्या झालेल्या एका रुग्णाला आम्ही सांगितलं, की उन्हात घराबाहेर गेल्यावर पुरेसं पाणी प्यायला असतास तर आजार टाळता आला असता. त्यानं दिलेलं उत्तर विचार करायला लावणारं होतं. ‘हा सोपा उपाय मला माहिती आहे, पण घराबाहेर शुद्ध पाणी मिळणं मात्र सोपं नाही. दूषित पाण्याच्या भीतीनं मी बाहेर पाणी पिणं टाळतो. आमच्याकडे पॅक्ड पाण्याच्या शुद्धतेचीही खात्री नसते.’स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, सुरक्षित अन्न हे दुरापास्त होत असेल, तर आपला विकासाचा गाडा उलट्या दिशेने चालला आहे, असंच म्हणावे लागेल. विकसित देशाची सोपी व्याख्या काय? ज्या देशातील लोक आपल्या घरात बेसिनला येणारं पाणी कसलंही फिल्टर्स न लावता बिनधास्त पिऊ शकतात, तो देश विकसित आहे, असं म्हणता येईल.वातावरण बदलाबाबत अधिक जागरूक होऊ या, इतरांना जागरूक करू या आणि आपल्या धोरणकर्त्यांनाही या मुद्द्याचं गांभीर्य समजेल अशी अपेक्षा बाळगू या.

# तालखेड वीजप्रश्नावर तोडगा लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील मौजे तालखेड येथे गेल्या एक ते दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या वीजपुरवठा समस्येमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी छेडलेले आमरण उपोषण अखेर मागे घेतले आहे. महावितरणकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

तालखेड येथे वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते. वीजबिल वसुलीत आघाडीवर असूनही तसेच वीज चोरीचे प्रमाण शून्य असतानाही अपुरा वीजपुरवठा मिळत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. यावर तोडगा न निघाल्याने २५ मार्च २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.



या उपोषणात कैलास मोरे, गुलाबराव मोरे, पंडित ओव्हाळ, रेवन यादव, दिनकर रिंगणे, राजाभाऊ परदेशी, नितेश खोटे, फरिद पठाण, वैभव मोरे, अनिल गायकवाड, सोपानराव वीर, आबासाहेब मोरे, रमेश शेंडगे, दयानंद जाधव आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते.

ग्रामपंचायत तालखेडच्या वतीने सरपंच सौ. गितांजली गुलाब मोरे, उपसरपंच श्री. पंडित बन्सी ओव्हाळ, ग्रामविकास अधिकारी श्री. सुग्रीव भारत भारती व सदस्यांनी उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देत तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती.

उपोषणादरम्यान महावितरण विभाग व ग्रामस्थ यांच्यात बैठक घेण्यात आली. यामध्ये माजलगाव उपविभागातील ३३ केव्ही मालीपारगाव वाहिनीवर अतिरिक्त भार पडत असल्यामुळे वारंवार वीज खंडित होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

समस्येच्या कायमस्वरूपी तोडग्यासाठी चडघतध २.० योजनेअंतर्गत नवीन ३३ केव्ही लिंक लाईन मंजूर करण्यात आली असून दोन उपकेंद्रांचे विभाजन करण्यात येणार आहे. आवश्यक साहित्य १० ते १२ दिवसांत उपलब्ध करून अंदाजे १५ दिवसांत काम पूर्ण केले जाईल, असे लेखी आश्वासन महावितरणकडून देण्यात आले.

दरम्यान, विजय दादा साळवे यांनी दोन्ही बाजूंमध्ये समन्वय साधत महत्त्वाची मध्यस्थी केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेत प्रशासनाला सहकार्य करण्याचा निर्णय घेतला.

तथापि, दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला असून आता महावितरणच्या कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वनविभागाच्या वतीने रुई येथे जागतिक जल दिनानिमित्त वृक्ष लागवड व संगोपन




**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव तालुक्यातील रुई येथे आज दिनांक २५ मार्च रोजी जागतिक जलदिनानिमित्ताने वनविभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले यावेळी उपवन उपवनसंरक्षक मा. मनीषा पाटील मॅडम, मा सहाय्यक वनसंरक्षक ( तेंदू व कॅम्पा) मा. श्री खेळ भांडे श्री देवकते वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक देगलूर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक जलदिनानिमित्ताने रुई खुर्द जल जंगल जमीन फाउंडेशन तर्फे वृक्षारोपण अभियान राबवण्यात आला यात अनेक झाडांची लागवड करण्यात आली यावेळी वन परिमंडळ अधिकारी नरसी श्री संत वाले वनरक्षक नरसी एस बगाटे वन रक्षक मरखेल सांगवीकर तसेच मजुरी खुर्द येथील सरपंच उपसरपंच ग्रामसेवक तंटामुक्ती अध्यक्ष विद्यार्थी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदुरा तालुक्यातील पटवारी भवन तात्काळ सुरु करण्याची संभाजी ब्रिगेडची मागणी



**दैनिक वादळ वार्ता**
**नांदुरा । प्रतिनिधी**

नांदुरा तालुक्यातील पटवारी भवनाचे बांधकाम पूर्ण होऊन सहा महिने उलटूनही अद्याप ते सुरू करण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.सातबारा, ८–अ, उतारा तसेच इतर महत्त्वाच्या दाखल्यांसाठी नागरिकांना वारंवार तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असून, यामुळे वेळ व पैशांचा अपव्यय होत आहे. विशेषतः शेतकरी व गरीब नागरिकांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.सरकारने नागरिकांच्या सोयीसाठी पटवारी भवन उभारले असले तरी ते अद्याप सुरू न झाल्यामुळे त्याचा अपेक्षित फायदा मिळत नाही. परिणामी नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन नांदुरा तालुक्यातील वसाडी कुषीनगर जवळील पटवारी भवन सुरू करून तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच संबंधित पटवारी यांना नियमित हजर राहण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकरी व संभाजी ब्रिगेड कड्डन करण्यात आली. यावेळी उल्हास कोल्हे, भागवत कोल्हे, मोहन पाटिल व दिलीप कोल्हे हजर होते.

# बीड जिल्हा बामुक्टा संघटनेच्या उपाध्यक्षपदी डॉ.विलास भिलारे, यांची बिनविरोध निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २६/०३/२०२६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ टीचर्स असोसिएशन( बामुक्टा) संघटनेच्या बीड, जिल्हा कार्यकारिणीची निवड बीड येथील बलभीम महाविद्यालयात दिनांक २५ .३. २०२६ रोजी दुपारी पाच वाजता विभागीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली असून यामध्ये सर्वानुमते बीड जिल्ह्याची कार्यकारणी निवड करण्यात आली., यामध्ये जिल्हा उपाध्यक्ष म्हणून चौसाळा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. विलास भिलारे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. बाबासाहेब कोकाटे आणि विभागीय उपाध्यक्ष डॉ. रमेश लक्ष्मणराव वारे यांच्या नियोजनात आणि ज्येष्ठ मार्गदर्शक खालील मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ. राजेश करपे, डॉ. अंकुश कदम व्यवस्थापन परिषद सदस्य छत्रपती संभाजी नगर, डॉ. विलास खंदारे, प्राचार्य डॉ. संतोश उंदरे, डॉ. मुंजा भाऊ धोंडगे, डॉ. आप्पासाहेब हुंबे, डॉ. सुनील कुमार वनंजे, डॉ. गफाट, डॉ. सरकटे, माजी प्राचार्य डॉ. हनीफ, प्राचार्य तथा सिनेट सदस्य डॉ विश्वास कंधारे, प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे, प्राचार्य प्रसाद मदन, डॉ. संजय कदम प्रा. समाधान माने सिनेट सदस्य बंडू सोमवंशी इत्यादी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये ज्येष्ठ नेते डॉ. फुलचंद सलामपुरे यांनी खालील प्रमाणे जिला कार्यकारिणीची निवड जाहीर केली अध्यक्ष डॉ. प्राचार्य अर्जुन मोरे वसुंधरा



महाविद्यालय घाटनांदुर अंबाजोगाई, उपाध्यक्ष डॉ. विलास भिलारे चौसाळा डॉ. राजकुमार थोरवे आष्टी डॉ. ज्ञानेश्वर शिंदे माजलगाव, कोषाध्यक्ष डॉ. संजय सुरवसे बीड, सचिव डॉ. शंकरराव वाघमारे नेकनूर, सहसचिव सुनील जाधव, डॉ. हरिभाऊ कदम शिरसाळा, डॉ. सतीश कदम, महिला प्रतिनिधी डॉ. सुचिता खामकर, डॉ. रफिक शेख, डॉ. राजकुमार चाटे, डॉ. सखाराम पांढरे, डॉ. रमेश माने, डॉ. गजानन दराडे डॉ. ज्ञानेश्वर येवले, डॉ. इंगोले, डॉक्टर अशोक होके, डॉ. सचिन खिस्ते, डॉ. पठाण गेवराई इत्यादी मान्यवरांचा जिल्हा कार्यकारणी समावेश झाला असून नवीन कार्यकारिणीच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी गेवराई, माजलगाव, परळी, केज धारूर बीड, पाटोदा, शिरूर, केज, येथील अनेक प्राध्यापक व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रावेर तालुक्यातील अजंदे व ऐनपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती जाहीर




**दैनिक वादळ वार्ता**
**जळगाव । जितु इंगळे**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांची जयंती उत्सव समितीची ऐनपूर येथे नुकतीच निवड करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी गौरव संतोष गाढे यांची एकमताने निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी संदीप अशोक भालेराव यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणीत सचिव प्रवीण अनिल अवसरमल, खजिनदार किरण सुभाष शिरतुरे यांची निवड करण्यात आली. तसेच तालुक्यातील अजंदे गावात समिती अध्यक्ष प्रल्हाद हिवरे . उपाध्यक्ष राज भालेराव . खजिनदार बंटी हिवरे . सचिव नंदू सोनवणे यांची निवड करण्यात आली यावेळी समाजबांधव व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुलसी संगणकशास्त्र महाविद्यालयात ‘जल महोत्सवा’चा जागर रॅलीद्वारे दिला जलसंवर्धनाचा संदेश




**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने जल महोत्सव: गावाचा उत्सव – देशाचा महोत्सव २०२६ या राष्ट्रीय अभियानांतर्गत रविवार, दि.२२ रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करून अभियानाचा उत्साहात समारोप करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या परिसरातून काढण्यात आलेल्या भव्य जलसंवर्धन रॅलीने झाली. ‘पाणी वाचवा, जीवन वाचवा’, ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ अशा घोषणा देत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रॅलीच्या माध्यमातून पाणी बचतीचे महत्त्व आणि पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनप्रबोधन करण्यात आले.

या राष्ट्रीय अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेश कसबे, ग्रीन क्लब समन्वयक प्रा.किशोर वाघमारे, सर्व स्वयंसेवक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आ.चिखलीकरांची आश्वासनपूर्ती; लोहा शहरात सार्वजनिक ठिकाणी ३० शौचालय ;कामाचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

नगर पालिका निवडणूक काळात शहरवासीयांना दिलेल्या आश्वासनपूर्तीसाठी आम्ही वचनबद्ध आहोत .नगराध्यक्ष शरद पवार उपनगराध्यक्ष करीमभाई व त्याची टीम शहराच्या विकासासाठी चागले काम करत आहेत .शहरात सार्वजनिक ठिकाणी शौचालय उभारण्यात येईल असे आश्वासन दिले त्याची पूर्तता केली जात असून शहरात ३० अद्यावत शौचागृह उभारले जाणार आहेत .शिवाय जुन्या शहरातील सिमेंट रस्ता सुरू आहे तर चौकाचे सुशोभिकारण लवकरच पूर्णत्वास जाणार आहे लवकर शहरातील प्रभागात विविध कामे सुरू होणार आहेत असे प्रतिपादन विधिमंडळ विधिउपसमितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे



लोहा शहरात स्वच्छ भारत मिशन योजनेतून लोहा शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक परिसर, जिल्हा परिषद हायस्कूल या भागात ३० शौचालय व मुतारीगृह ,स्नानगृह उभारण्यात येणार आहे त्या कामाचे भूमीपूजन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर याचा हस्ते वीज वितरण कार्यालयासमोर मंगळवारी (२४ मार्च ) करण्यात आले यावेळी युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, माजी उपनगराध्यक्ष नगरसेवक केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण,माजी सभापती खुशाल पाटील ,भास्कर पवार, पंकज परिहार अविनाश पवार,तुकाराम दाढेल गणेश बगाडे,मारुती जंगले, बंडू वडजे, नगरसेवक सदा तेलंग, शेषराव तेलंग, सतीश निखाते, अनिल धुतमल, भानूपाटील पवार सूर्यकांत पार्डीकर, शहाजी पवार अभियंता शरद राहेरकर कंत्राटदार केंद्रे गंगाधर महाबळे,राजेश बोडके यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते

आ प्रतापराव पाटील यांनी नगर पालिका निवडणुकीत शहरवासीयांना जे आश्वासन दिले होते त्यात सार्वजनिक शौचालय उभारणी याच समावेश होता लोकमान्य नगराध्यक्ष शरद पवार, यांनी पदभार स्विकारल्या नंतर शंभर दिवस अजून झाले नाहीत पण त्याची टीम चागले काम करत आहे आमदार प्रतापराव याच्या हस्ते शहरातील ३० स्वच्छतागृहाचे भूमिपूजन करण्यात आले याप्रसंगी त्यांनी शहरवासीयांनी दिलेल्या

आश्वासनपूर्ती केली जात असून या सार्वजनिक शौचालयामुळे नागरिकांची होणारी गैरसोय दूर होईल शिवाय गेल्या अनेक वर्षांपासून असलेली मागणी या निमित्ताने पूर्णत्वास जात आहे जुन्या शहरात जाणार सिनेट रस्ता मी पहिल्यांदा आमदार झाल्यावर नगराध्यक्षा मातोश्री जिजाबाई मुकदम यांच्या काळात झाला होता पुन्हा आमच्याच कार्यकाळात प्रशस्त सिमेंट रोड होतो आहे. मुख्य चौकातील छत्रपती शिवरायांच्या पुतळा समोरील गोलाईत आकर्षक सुशोभीकरण लवकरच पूर्ण होणार आहे विविध विकास कामे होतील शहरात नगराध्यक्ष शरद पवार उपनगराध्यक्ष करीम भाई व टीम चांगले काम करत आहेत जनतेच्या अडीअडचणी ते सोडवित असेल असा विश्वास आ चिखलीकर यांनी व्यक्त केला.

सार्वजनिक दहा ठिकाणी स्वच्छतागृह-नगरसध्यक्ष पवार, आ चिखलीकर व युवा नेते प्रवीण पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहरातील जनतेनी आमच्यावर विश्वास टाकला व कारभार करण्याची संधी दिली .त्याच्या अपेक्षापूर्तीला पात्र ठरवू आज आ चिखलीकर साहेब यांच्या हस्ते सार्वजनिक ठिकाणी ३० शौचालय उभारणीसाठीची पायाभरणी शुभारंभ झाला जनावरांचा बाजार ,मोंढा, तहसील कार्यालय ,जुना लोहा ,इंदिरा नगर, वाडी तांडे असा भागात लवकरच सार्वजनिक शौचालय उभारण्यात येणार आहेत असे नगराध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले

---

# केजमध्ये "SIR' मतदान जनजागृती कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## मा.नगरसेवक कपिल मस्के यांच्या पुढाकारातून शेकडो नागरिकांची नोंदणी; मतदान यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी गर्दी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

खा.बजरंग सोनवने यांच्या सूचनेनुसार केज शहरात 'डखठ' मतदान जनजागृती व नोंदणी मोहिमेला आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. फुलेनगर येथील रमाई चौक परिसरात मा. नगरसेवक कपिल मस्के यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.



या कॅम्पमध्ये फुलेनगर, आंबेडकर नगर, हाउसिंग कॉलनी, कामगार नगर, मोंढा परिसर, गोसिया मस्जिद परिसर, केजीएन नगर, रमाई नगर आणि जलाल नगर या भागांतील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे हजेरी लावली. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या उपक्रमाचा लाभ घेत अनेकांनी आपली मतदान नोंदणी पूर्ण केली तसेच मतदान यादीत नाव समाविष्ट करण्याची प्रक्रिया पार पाडली.

नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे व मतदान ओळखपत्रासह उपस्थित राहून डखठ अंतर्गत नोंदणी केली. विशेषतः तरुण मतदारांमध्ये या उपक्रमाबाबत उत्साह दिसून आला.

लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मतदाराचा सहभाग महत्त्वाचा असल्याने अशा जनजागृती कॅम्पमुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढत असल्याचे मत उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आले.

---

# पंचशील नगरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी गोटु लांडगे तर सचिव पदी मनोज फुलवरे

## नगरसेवक सचिन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार जंयती उत्सव

दैनिक वादळ वार्ता
**माजलगांव । उफाडे मच्छिंद्र**

शहरातील पंचशील नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. माजलगाव नगर परिषदेचे नगरसेवक सचिन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच नियोजन बैठक पार पडली.



या बैठकीत जयंती उत्सवाची सविस्तर तयारी आणि नियोजन करण्यात आले. तसेच जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली. कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी गोटू लांडगे, उपाध्यक्षपदी स्वप्नील टाकणखार आणि सचिवपदी मनोज फुलवरे यांची निवड करण्यात आली.

बैठकीस पंचशील नगर परिसरातील आंबेडकरवादी तरुणांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी जयंती उत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम तसेच जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत चर्चा झाली.

यंदाचा जयंती उत्सव अधिक भव्य आणि उत्साहपूर्ण पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

---

# नायगाव येथे एअरटेल पेमेंट बँक सेवा केंद्रचा भव्य शुभारंभ



दैनिक वादळ वार्ता
**हनुमंत चंदनकर । नांदेड**

नांदेडच्या नायगाव शहरातील साई मल्टी सर्विस येथे आज दिनांक २५ मार्च २०२६ रोजी झोनल मॅनेजर मयंक सिंग, जिल्हा मॅनेजर रमिज अहमद सर्विस मॅनेजर मजहर शेख साई मल्टी सर्विस तथा नायगाव ब्रांच मॅनेजर श्री पवन गादेवार यांच्या शुभहस्ते रिबीन कापून एअरटेल पेमेंट बँकेचा शुभारंभ करण्यात आला तदनंतर सन्माननीय पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला एअरटेल पेमेंट बँकेच्या माध्यमातून नायगाव शहरासह तालुक्यातील अनेक नागरिकांना याचा फायदा होणार आहे नांदेड जिल्ह्यातील दुसरी शाखा या माध्यमातून नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध होणार आहेत यावेळी वैभव नारे कम्प्युटर ऑपरेटर गंगासागरताई वाघमारे , विष्णू करखेले यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

---

## वृत्तपत्र उद्योगाच्या बचावासाठी व्हॉईस ऑफ मीडियाचे निवेदन

# १५०% जाहिरात दरवाढीसह विविध मागण्यांसाठी शासनाकडे धाव

दैनिक वादळ वार्ता
**माहूर । प्रतिनिधी**

राज्यातील वृत्तपत्र उद्योग गंभीर आर्थिक संकटातून जात असून त्याच्या संरक्षणासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम, तालुका शाखा माहूर यांच्या वतीने राज्य सरकारकडे माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप यांचे मार्फत संघटित निवेदन सादर करण्यात आले



दि. २५ मार्च २०२६ रोजी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना उद्देशून हे निवेदन मा. तहसीलदार, माहूर यांच्यामार्फत पाठविण्यात आले. या निवेदनात वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून सध्या वाढत्या खर्चामुळे तो अडचणीत सापडल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवेदनानुसार, सन २०१९ पासून कागद, मुद्रण साहित्य, वीज व इतर खर्चामध्ये तब्बल १५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, शासकीय जाहिरात दरात त्यानुसार वाढ करण्यात आलेली नाही. यामुळे विशेषतः लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत शासकीय जाहिरात दरात किमान १५०% वाढ करावी ई-टेंडर व शासकीय जाहिराती पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध कराव्यात जाहिरातींसाठी किमान १०० चौ. से. आकार निश्चित करावा जाहिरात देयके ३० दिवसांत अदा करून विलंब झाल्यास व्याज द्यावे लघु व मध्यम वृत्तपत्रांना जाहिरात वाटपात समान संधी द्यावी सर्व शासकीय जाहिराती माहिती खात्यामार्फत देण्याची सक्ती करावी प्रलंबित देयके तात्काळ अदा करावीत १० वर्ष सेवा असलेल्या पत्रकारांना अधिस्वीकृती व २० वर्ष सेवा व ५५ वर्ष वय पूर्ण झालेल्यांना पेन्शन लागू करावी वृत्तपत्र उद्योग मजबूत राहिल्यासच जनतेच्या माहितीच्या अधिकाराचे संरक्षण होऊ शकते. त्यामुळे शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनावर व्हॉईस ऑफ मीडिया, माहूरचे तालुकाध्यक्ष इलियास बावाणी, जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले, तालुका सरचिटणीस संजय बनसोडे, फिरोज पठाण, गजानन कुलकर्णी, सचिन बेहेरे सय्यद किरमाणी आदी पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

# यश कोचिंग क्लासेसचे नितीन सर यांच्या विद्यार्थीची नवोदय परीक्षेत धडाकेबाज कामगिरीबद्दल क्लासेच्या विद्यार्थीचा सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

कंधार येथील नितीन सर यांचे यश कोचिंग क्लासेसने गेल्या अनेक वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात अभुतपूर्व कामगिरी स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यश कोचिंग क्लासेस चे २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार सोमवारी दिनांक २३ मार्च २०२६ रोजी करण्यात आला. यश कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून सदरील परीक्षेत अर्जुन शरद दहिफळे ९६.२५ टक्के, अभिमन्यू किशन गीते ९५ टक्के, शेख अमायरा मोबीन ९२.५० टक्के, श्रीनिवास ज्ञानेश्वर हेंडगे ९२.५० टक्के, आरोही विनोद कांबळे ८६.२५ टक्के, श्रेयश विठ्ठल मुंडे ८६.२५ टक्के, सायली बालाजी हातागळे ८५ टक्के, सोहम संतोष खरात ८५ टक्के, ओम साई सोपान इबिते ८५ टक्के, माही विजय राठोड ८३.७५ टक्के, कल्याणी बसवेश्वर मठपती ८२.५० टक्के, मनस्वी राजेश्वर उमाटे ८१.२५ टक्के, वेदिका सुनील कतुरे ८१.२५ टक्के,आर्या गेलसिंग कचवे ८० टक्के, प्रसाद प्रल्हाद मुंडे ८० टक्के, आदर्श विष्णू राहेरकर ८० टक्के, अवधूत किशन डांगे ८० टक्के, तेजल जलवंत खरात ७८.७५ टक्के, आराध्या विक्रम चुकुलवाड ७८.७५ टक्के, शिफा जिलानी शेख ७८.७५ टक्के, मनमत दीपक बावरे ७७.५० टक्के, ईशान सागर मुखेडकर ७७.५० टक्के, यशवंत गजानन गुट्टे ७६.२५ टक्के, संतोष शिवाजी चौकटे ७६.२५ टक्के, तक्ष महेशकुमार येमेकर ७६.२५ टक्के, प्रतीक प्रताप वाघमारे ७५ टक्के, प्रथमेश दीपक जाधव ७५ टक्के आदी विद्यार्थी यश कोचिंग क्लासेस च्या शिक्षकांच्या चांगल्या मार्गदर्शनामुळे नवोदय परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत .







या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव म्हणून यश कोचिंग क्लासेस चे संचालक नितीन सर यांनी व तसेच त्यांचे सहकारी शिक्षक यांच्यावतीने सोमवारी दि. २३ मार्च रोजी नवोदय विद्यालय परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंतनु कैलासे सर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ज्ञानेश्वर केंद्रे, नगरेश्वर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बसवेश्वर मंगनाळे सर , झडते सर, कलमे सर, मोबीन सर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते जवाहर नवोदय परीक्षेमधील २८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी यश कोचिंग क्लासेस चे संचालक नितीन जोंधळे सर, देवानंद कारामुंगे, बालाजी कळणे, पंकज घाटे, शेख सुमेरा, अश्विनी बोरकर, आरती रत्नपारखे, पत्रकार राजेश्वर कांबळे, ड. सिद्धार्थ वाघमारे, संभाजी कांबळे, निलेश गायकवाड आधी सह विद्यार्थी व विद्यार्थीचे पालक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# प्रत्येक उपक्रमात सहभाग नोंदविणारी शाळा म्हणजे साने गुरुजी निवासी विद्यालय केज-सुनील केंद्रे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.२६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे राज्य शाळा मानांकन प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळां साठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. शाळांचे स्वयं मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या ाऱ.रल.ळप या वेबसाईटवरील SQAAFमुल्यांकनासाठी scert-data.web.app ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. सन २०२४-२५ मध्ये राज्या तील१,०२,६७५ शाळांनी स्वयं मूल्यांकन पूर्ण केले. सन २०२४-२५ मध्ये स्वयं मूल्यांकनामध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळांपैकी सन २०२५-२६ मध्ये १०७१२ शाळांची बाह्य मूल्यांकन करण्यासाठी निवड करण्यात आली होती.त्यापैकी १०६४४ शाळांचे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले.यात.बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज या तीनही शाळांना स्वयं मूल्यांकन व त्रयस्थ व्यक्तींकडून केलेले बाह्य मूल्यांकन यात सर्वाधिक गुणप्राप्त होऊन (अ+प्लस) श्रेणी प्राप्त झाली आहे.राज्यातील ४० शाळांमध्ये या तीनही शाळा असून नुकतेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आंबेजोगाई च्या वतीने शाळेस अभिनंदनचे पत्र प्राप्त झाले आहे. दर्जा प्राप्त झाल्यानंतर शाळेच्या दर्शनी भागात नामफलकाचे अनावरण केज गट शिक्षणाधिकारी श्री.सुनील केंद्रे यांच्या करण्यात आले या प्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की,साने गुरुजी निवासी विद्यालय केज ही शाळा प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभाग नोंदवत असते त्या उपक्रमात जीव ओतून प्रदर्शन करून प्रत्येक पारितोषिक आपल्या शाळेला कसे मिळेल या दृष्टीने आपला प्रदर्शन करते या मुळे येथील सर्व कर्मचारी अतोनात परिश्रम करून सहभाग नोंदवत असतो याचा प्रत्यय मला नेहमीच येतो.आपल्या सर्व समुहाच्या मेहनती मुळे शाळेने आपला दबदबा निर्माण केला आहे.कोणतीही स्पर्धा असो त्या स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाचा चमु चमकलेला असतो या मुळे या परिवाराचे मनापासून कौतुक करुन अभिनंदन करतो असे मत व्यक्त केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड, उपाध्यक्ष राजेश कापसे, संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता गित्ते-कराड मॅडम व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# केज नगरपंचायतीचे रणशिंग फुंकले! युवा नेते रणजित आडसकर यांच्या एन्ट्रीने राजकीय समीकरणे बदलणार?

दैनिक वादळ वार्ता
**प्रकाश मुंडे । विशेष प्रतिनिधी**

येणाऱ्या वर्षात होऊ घातलेल्या केज नगरपंचायत निवडणुकीचे वेध आतापासूनच शहरवासीयांना लागले आहेत. या निवडणुकीत सर्वात मोठी आणि महत्त्वाची घडामोड म्हणजे युवा नेते रणजित आडसकर यांचा होणारा दमदार प्रवेश. स्व. बाबुरावजी आडसकर यांचे नातू आणि ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांचे चिरंजीव असलेल्या रणजित आडसकर यांच्या सक्रियतेमुळे केजच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**आडसकरांच्या एन्ट्रीने वातावरणात उष्णता**

रणजित आडसकर यांनी केज शहराच्या राजकारणात उतरण्याचे निश्चित केल्याने प्रस्थापित गटांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. अभ्यासू व्यक्तिमत्व आणि वारसा लाभलेले नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आता उत्सुकता केवळ एकाच गोष्टीची आहे की, रणजित आडसकर स्वतः नगराध्यक्षपदासाठी मैदानात उतरणार की नगरसेवक म्हणून निवडणूक लढवून किंगमेकरची भूमिका बजावणार? या प्रश्नाचे उत्तर लवकरच मिळणार असले तरी, त्यांच्या आगमनाने निवडणुकीत मोठी चुरस निर्माण होणार हे मात्र नक्की.



**बड्या नेत्यांच्या गटात होणार 'काटे की टक्कर'**

यावेळी केज नगरपंचायतीची निवडणूक केवळ स्थानिक मुद्द्यांवर नाही, तर दिग्गज नेत्यांच्या प्रतिष्ठेची ठरणार आहे. प्रामुख्याने खालील गटांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळेल:
आडसकर गट (रमेश आडसकर यांच्या नेतृत्वाखाली)
आ.मुंदडा गट
खा.बजरंग बप्पा सोनवणे गट,
खा.रजनीताई पाटील गट,
हारुण भाई इनामदार गट,
पशुपतीनाथ दांगट पाटील,
अंकुश अण्णा इंगळे
या दिग्गज गटांसोबतच अनेक अपक्ष उमेदवार आणि छोट्या-मोठ्या स्थानिक आघाड्यांनीही कंबर कसली असून, ते कुणाचे गणित बिघडवतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

'किंगमेकर' कोणाच्या बाजूने?

मोठ्या गटांशिवाय केजमधील काही ठराविक नेत्यांच्या भूमिकेकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. यामध्ये:
सौ. सिताताई बनसोड,
कपिल मस्के,
दलित पँथरचे कार्यकर्ते
या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची भूमिका कोणाच्या बाजूने झुकते, यावर केज नगरपंचायतीची सत्ता कोणाच्या हाती जाणार याचे भवितव्य अवलंबून असेल. सद्यस्थितीत केजचे राजकीय वातावरण पूर्णपणे ढवळून निघाले असून, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी आणि रणनीती आखण्याला वेग आला आहे.


थोडक्यात सांगायचे तर...

केज नगरपंचायतीचा आगामी रणसंग्राम हा ऐतिहासिक ठरणार आहे. युवा रक्ताची एन्ट्री आणि प्रस्थापितांचा अनुभव यांच्यात होणारी ही लढत केज शहराचा चेहरामोहरा बदलणारी ठरेल का? हे येणारा काळच सांगेल.

# धुळे-सुरत महामार्गावर भीषण अपघात; अनियंत्रित ट्रेलर शेतात घुसला,कांदा पिकाचे मोठे नुकसान

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

धुळे सुरत राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, (२५ मार्च) सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास बर्डीपाडा फाट्याजवळ एक भीषण अपघात घडला. राजस्थानहून येणारा एक ट्रेलर अचानक अनियंत्रित होऊन थेट रस्त्यालगतच्या शेतात शिरल्याने शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेल्या कांदा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, जीजे ३९ टी ३२७६ क्रमांकाचा ट्रेलर धुळ्याकडून सुरतकडे जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेला हा ट्रेलर महामार्गावरून खाली उतरून थेट बर्डीपाडा येथील शेतकऱ्याच्या शेतात घुसला. सुदैवाने, या घटनेत मोठी जीवितहानी टळली आहे. या अपघातात ट्रेलर चालक भवानी शंकर दरोगा (वय ३०, भिलवाडा,



राजस्थान) हे किरकोळ जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच नाळीज धाम रुग्णवाहिकेचे पायलट सुरेश वसावे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या मदतीने जखमी चालकाला विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.ट्रेलर शेतात घुसल्यामुळे बर्डीपाडा येथील स्थानिक शेतकऱ्याच्या कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. काढणीला आलेले पीक डोळ्यादेखत उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. या नुकसानीचा योग्य पंचनामा करून भरपाई मिळावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

# केजमध्ये चक्रवर्ती सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती साजरी

## वेळूवन बुद्ध विहारात धम्मबांधवांची मोठी उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

येथील भीमनगर भागातील वेळूवन बुद्ध विहारामध्ये भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा आणि समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने चक्रवर्ती सम्राट अशोक यांचा २३३० वा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात आणि धम्ममय वातावरणात साजरा करण्यात आला. धम्मचक्राचे प्रवर्तन करणाऱ्या महान सम्राटाला अभिवादन करण्यासाठी परिसरातील अबालवृद्ध धम्मबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि सामूहिक त्रिशरण-पंचशील ग्रहणाने झाली. यावेळी संपूर्ण परिसरात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेचे अध्यक्ष जयपाल मस्के यांनी सम्राट अशोकांच्या धम्मविजयाचा ऐतिहासिक प्रवास उलगडला. ते म्हणाले, सम्राट अशोकांनी



कलिंग युद्धातील हिंसा पाहिल्यानंतर शस्त्राचा त्याग करून बुद्धांचा शांतीचा मार्ग स्वीकारला. केवळ तलवारीच्या जोरावर जिंकण्यापेक्षा मन जिंकण्याचा 'धम्मविजय' त्यांनी जगाला शिकवला, तोच वारसा आपल्याला पुढे न्यायचा आहे.

तसेच, कोषाध्यक्ष चंद्रकांत मस्के यांनी सम्राट अशोकांच्या लोककल्याणकारी शासन पद्धतीवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला महिला शहर शाखेच्या अध्यक्षा सुनीता कांबळे, सरचिटणीस सुरेखा मस्के यांच्यासह कुसुम मस्के, रत्नमाला मस्के, हौसाबाई हजारे, पुष्पा मस्के, अश्विनी हजारे, कलावती हजारे व इतर महिला पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून सम्राट अशोकांच्या विचारांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सरचिटणीस शिवकुमार मस्के यांनी केले.या सोहळ्यात महेंद्र मस्के, कल्याण मस्के, दिपक मस्के, कपिल मस्के यांच्यासह समीक्षा मस्के, भक्ती मस्के, समीक्षा गायकवाड व अनेक उपासक-उपासिका उपस्थित होते. शेवटी 'सरणत्तय' घेऊन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# बोरद प्राथमिक आरोग्य केंद्रात 'क्षयरोग क्ष-किरण' तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन

## ८० पेक्षा अधिक संशयित रुग्णांची मोफत तपासणी; आरोग्य विभागाचा कौतुकास्पद उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

क्षयरोग निर्मूलनाच्या मोहिमेला गती देण्यासाठी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेंद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार, दिनांक २५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र बोरद येथे भव्य क्ष-किरण तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, दिवसभरात ८० पेक्षा अधिक रुग्णांची क्ष-किरण तपासणी करण्यात आली.

शिबिराचे औपचारिक उद्घाटन गावातील सरपंच अनिता भिलाव,उपसरपंच संतोष ढोडरे व उपस्थित ग्रामपंचायत सदस्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधींनी आरोग्य विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक करत, नागरिकांनी आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.वैद्यकीय अधिकारी डॉ. कुंजप्रिया पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले. या मोहिमेत तालुका क्षयरोग टीमचे मनोज पिंजारी, रियाज देशमुख, ब्रम्हा पावरा, दिपक पावरा, मनिषा भामरे,




सुनंदा वळवी, संजय चौधरी, कविता वसावे, मनोज बैसाणे, विनोद वळवी, दिपक बेहरे आणि भारती बेहरे यांनी तांत्रिक आणि प्रशासकीय जबाबदारी पार पाडली.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व समुदाय आरोग्य अधिकारी , आशा सेविका आणि आशा पर्यवेक्षिका यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील रुग्णांना स्थानिक पातळीवरच अद्ययावत तपासणी सुविधा उपलब्ध करून दिल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# युसूफ वडगाव येथे श्रीराम नवमी निमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; १५१ युवकांचे रक्तदान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसूफ वडगाव येथे श्रीराम नवमीचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्रीराम जन्मोत्सव समिती आणि स्व.मेजर शिवराज खरबड यांच्या स्मरणार्थ आधार युवा मंचच्या वतीने आयोजित या शिबिरात १५१ युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.युसूफ वडगाव चे ग्रामदैवत प्रभू श्रीराम यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून गेल्या १४ वर्षां पासून आधार युवा मंच च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात.याच परंपरेचा भाग म्हणून बुधवारी दि.२५ मार्च रोजी गावातील हनुमान मंदिरात या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या मध्ये सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.सकाळी शिबिराची सुरुवात झाल्यानंतर गावातील तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला.रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान हा संदेश गिरवत एकूण १५१ युवकांनी यावेळी रक्त दान केले.ग्रामीण भागात अशा प्रकारे मोठ्या संख्येने युवकांनी पुढे येऊन रक्तदान केल्यामुळे सर्वत्र कौतुक होत आहे.



**१४ वर्षांची अखंड परंपरा**

स्व.मेजर शिवराज खरबड यांच्या स्मृती जपत आधार युवा मंचने ही सेवाभावी परंपरा कायम ठेवली आहे.हे शिबिर यशस्वी करण्या साठी आधार युवा मंच च्या सर्व सदस्यांनी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.उत्स्फूर्त प्रतिसादामुळे परिसरा तील आरोग्य यंत्रणेला रक्ताचा मोठा साठा उपलब्ध झाला आहे.या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# तळोदा तालुक्यातील दसवड येथे भीषण अपघात केळीची गाडी उलटून ८ मजूर गंभीर जखमी!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील दसवड येथे केळीची वाहतूक करणारे वाहन पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात आठ मजूर गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, गाडी उलटल्यानंतर मजुरांमध्ये एकच आक्रोश पाहायला मिळाला. सर्व जखमी हे रोझवा येथील रहिवासी असून या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, केळी भरून जाणारे वाहन दसवड परिसरातून जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने ते अचानक पलटी झाले. या वाहनात केळीसोबतच मजूरही



प्रवास करत होते. गाडी उलटल्याने मजूर केळीच्या घडांखाली आणि वाहनाखाली दबले गेले. स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत बचावकार्य सुरू केले आणि जखमींना बाहेर काढले.

या अपघातात शिवाजी राघव पाडवी (वय ३५), दशरथ नोरा पावरा (वय ३०),महेश भरत पावरा (वय १८),प्रिया सुभाष पावरा (वय १८) गोरमी मोना पावरा (वय २०),सुरमिंग राण्या वसावे (वय २०),मास एजाज बागवान (वय १९),रविंद बामण्या पावरा (वय २५) असे एकूण ८ जण जखमी झाले आहेत.

अपघातानंतर जखमींना तातडीने रुग्णवाहिका आणि खासगी वाहनांच्या मदतीने तळोदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून प्राथमिक उपचार केल्यानंतर, काही मजुरांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील तसेच अधिक उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. दरम्यान, मालवाहू वाहनातून मजुरांची वाहतूक करणे धोकादायक ठरू शकते, त्यामुळे वाहनचालकांनी आणि मजुरांनी प्रवासादरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077